नवराष्ट्र

जाणीव • वन विभागासह नागरिकांचा पुढाकार गरजेचा; उपाययोजना करणे सामूहिक जबाबदारी

# मानव, वन्यजीव संघर्ष टाळण्यासाठी उपाय गरजेच

विलास देशमुख । नवराष्ट्र

**अकोला.** अलीकडे मानव-वन्यजीव संघर्ष वाढत असून एक समस्या बनत आहे. मात्र त्यामागील कारणांचा शोधही घेणे तेवढेच गरजेचे आहे. कमी होत जाणारे जंगलांचे आकारमान, खाद्याची उपलब्धता, पाण्याचा अभाव, वन्यजीवांच्या प्रदेशांमध्ये मानवाची घुसखोरी आदींमुळे वन्यप्राणी शहराकडे वळता आहेत. हे टाळण्यासाठी केवळ वन विभागाच नव्हे तर नागरिकांनीही पुढाकार घेण्याची गरज निर्माण झाली आहे. जागतिक वन्यजीव दिनाच्या निमित्ताने जिल्ह्यातील मानव वन्यजीव संघर्षाचा घेतलेला हा आढावा.

जंगलाचे स्वरूप लहान लहान तुकड्यांमध्ये पालटल्याने 'मानव व वन्यजीव संघर्ष' निर्माण होत आहे. जिल्ह्यात प्रामुख्याने पानगळीची वने, काही गवताळ, मैदानी प्रदेश तसेच खुरटी वने आहेत. त्यामध्ये विपुल अशी जैवविविधता असून जिल्ह्यात प्रामुख्याने बिबट, अस्वल, रानकुत्रे, तडस, कोल्हा, लांडगा, रानडुक्करासारख्या हिंस्त्र पशुंसह अनेक प्रकारचे तृणभक्षी प्राणी, पक्षी आढळतात. विदर्भात मागील दहा- दहा वर्षांत वन्यजिवांकडून सुमारे दोन हजारांवर मनुष्यांवर आक्रमणे तर दहा हजारांहून अधिक पाळीव पशूधनाची हानी झाल्याच्या घटना घडल्या आहेत. चंद्रपूर जिल्ह्यात अशा घटना सर्वाधिक प्रमाणात होत आहेत तर अकोला जिल्ह्यात अधून-मधून बिबट्याचा गोधनावरील हल्ल्याच्या घटना सामोर येत असतात.

**उन्हाळ्यात असतात संघर्षाची चिन्हे :** उन्हाळ्याची चाहूल आता लागली असून या काळात मानव-वन्यजीव संघर्षाची अधिक प्रकरणे समोर येतात. या काळात वन्यप्राण्यांना मुबलक पाणी उपलब्ध होत नसल्याने ते पाण्याच्या शोधात शहराकडे धाव घेतात. जिल्ह्यात अनेकदा विहीरीत बिबट, अस्वल, कोल्हा, नीलगाय यासारखे वन्यजीव पडल्याच्या घटना घडल्या आहेत. वन विभाग व रेस्क्यू टिमकडून त्यांचे नंतर रेस्क्यू करण्यात येते. अनेक जिल्ह्यात जंगल परिसरात पानवठ्याची व्यवस्था करण्यात आली आहे तरी ती अपुरी पडत आहे.

## मानसिकता बदलणे गरजेचे

आजही जंगलालगतची अनेक कुटुंबे जळाऊ लाकडासाठी जंगलावर निर्भर आहेत. अनेक रस्ते जंगलांमधून जातात. मोहफुले, तेंदूपत्ता आदी संकलित करण्यासाठी काहीजण जंगलांमध्ये जातात. अशावेळी त्यांना काळजी घेण्याच्या सूचना करुनही सूचनांचे उल्लंघन केले जाते. अशावेळी रात्री-अपरात्री जंगलात दाखल होताना असा संघर्ष घडतो.



उन्हाळ्यात वन्यप्राणी मानव संघर्षाच्या काही घटना घडतात. आपल्या पशुधनाच्या सुरक्षेसाठी गोठ्याचे नीट बांधकाम करुन त्याला व्यवस्थित कुंपण करावे. शेतातील उघड्या विहीरी झाकाव्यात. शेतातातील पिकांच्या संरक्षणासाठीही कुंपण करावे. तसेच कुठलीही वन्यप्राण्यांशी संबंधित घटना घडल्यास वन विभागाशी तत्काळ संपर्क साधावा.

-**सुरेश वडोदे**, सहाय्यक वनसंरक्षक, अकोला

## ...अशी आहे जिल्ह्याची स्थिती

जिल्ह्यात एप्रिल ते जूने 2023 दरम्यान 584 वन्यप्राण्यांकडून नुकसानीच्या तक्रारींमध्ये 21.66 लाखांची मदत देण्यात आली आहे. तर 16 पशुधनाची हानी झाली असून 1.58 लाखांची मदत वन विभागाकडून दिली आहे. तर मनुष्यहानीच्या 4 घटनांमध्ये 47 हजारांची मदत अशा एकूण 604 घटनांमध्ये 23.71 लाखांची मदत दिली आहे. तर जुलै ते सप्टेंबर 2023 मध्ये पीक नुकसानीच्या 864 तक्रारींमध्ये 32.11 लाखांची मदत, 13 पशुधन हानीच्या घटनेत 1.36 लाखांची तर 4 मनुष्यहानीच्या घटनेत 3.95 लाखांची मदत अशा एकूण 881 तक्रारींमध्ये 37.42 लाखांची मदत दिली आहे. तर ऑक्टोबर ते डिसेंबर 2023 दरम्यान 844 पिकनुकसानीच्या तक्रारीपोटी 34.47 लाख, 4 पशुधन हानीच्या तक्रारीपोटी 44 हजार, 2 मनुष्यहानीच्या तक्रारीपोटी 1.45 लाख अशी 850 तक्रारींपोटी 36.36 लाखांची मदत दिली आहे. एप्रिल ते डिसेंबर 2023 दरम्यान वनविभागाकडून पिकनुकसानीच्या एकूण 2292 पीक नुकसानीच्या तक्रारींपोटी 88.24 लाख, 33 पशुधनहानीसाठी 3.38 लाख, 10 मनुष्यहानीसाठी 5.87 लाख असा एकूण 2 हजार 335 तक्रारींपोटी 97.49 लाखांची मदत वन विभागाकडून देण्यात आली आहे.